**S.C.C. २९३/२०१३**

**नि. १०**

**आरोपी तर्फे जादा सरतपासाचा उलटतपास ॲड.एस.एस.साखरे यांचेकडुन**

आमचे या व्यवसायासाठी सहा कामगार आहेत. हे कामगार माल भरणे, उतरणे, पोहचवणे अशी कामे करतात. मी स्वत: अकौंटींग करतो. ज्यावेळी गि—हाईक येते त्यावेळी त्याचे बिल मी बनवतो, अशा बिलाच्या दोन प्रती तयार करतो. बिलावर माल घेणा—याच्या सहया घेत नाही. हे म्हणणे खरे नाही की, एकुण तीन बिले केली जातात. हे म्हणणे खरे नाही की, मालवाहतुकीसाठी दोन परवाने तयार करतो. माल वाहतुकीसाठी चार परवाने तयार करतो. त्या परवान्यावर भारत सरकारचा शिक्का असतो. आमचेकडे त्या पैकी कोणताही परवाना रहात नाही. आमचे वाहनाने माल पोहोच करतो. त्या परवान्यावर आमचे वाहनाचा नंबर असतो. सदर मालवाहतुकीच्या वेळी परवाना वाहनासोबत असतो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे वाहना सोबत असलेला परवाना आमचेकडेच रहातो. प्रत्येक बिल मी तयार करतो. नि.४७ मध्ये नमुद असलेले व्हॉउचर प्रमाणे बिले व पावती मी कामी दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, नि.४७ चा उतारा हा आरोपीचा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.६ एप्रिल २०१३ चे पुर्वी देखील आरोपीने आमचेशी व्यवहार केले आहेत. दि.०१/०४/२०१३ पुर्वीचा आरोपीचा खाते उतारा मी दाखल केला नाही. आरोपीकडुन इतकी रक्कम येणेबाकी आहे याची पोहोच मी त्याचेकडुन घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मीच अकौंट तयार करीत असलेमुळे मी खोटा खातेउतारा दाखल केला आहे व खोटे प्रमाणपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खाते उतारा व प्रमाणपत्र खोटे आहे.

उलटतपास पुर्ण,

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

(जी.एस.माने)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोरेगांव

तारीख : ०६/०६/२०२२